Press Release

**GOA TOURISM DEVELOPMENT CORPORATION DECLARES WAR ON PLASTIC, BANS USE OF BOTTLES, CUPS AND STRAWS MADE OF PLASTIC**

- Goa Tourism Development Corporaion (GTDC) announces eliminating use of plastic from head office to hotels across the State
- All residencies to be plastic bottle/cup/straw free in 3 months
- Hotel industry to be roped in to the campaign

Panjim, July 20: The Goa Tourism Development Corporation (GTDC) today announced the elimination of plastic bottles/cups/straws starting this practice from its headquarters to its hotels (GTDC Residencies) across the State.

The Hon'ble Chairman of GTDC, Mr. Dayanand Sopte said, "This decision will go a long way in contributing towards environment protection and in reducing plastic waste which has become a bane in the State. Growing plastic waste is a major concern and it is important to keep our environment plastic free."

This decision was taken at a recently held GTDC Board meeting where henceforth water, tea, coffee etc will be served in cups of paper or glass. Water dispensers, water filters will be installed at the tourism head office and residencies. Water will be served in metal or glass bottles which will be re-fillable.

Speaking further on this initiative, Mr. Sopte said "We at GTDC have taken on this campaign from the head office first and all our residencies will execute this within the next three months so that we can play a significant role in the endeavour to conserve the environment. This decision of banning use of plastic items will help towards creating an environmentally sustainable tourism sector."

Plastic bottles are amongst the major plastic items used in the tourism industry and they alone contribute to over 20 per cent of plastic pollution in the oceans. GTDC's residencies across the State will phase out the use of plastic bottles, plastic cups and straws in the next three months.

On achieving this, we will rope in the tourism stakeholders and other partners in the hospitality sector to be part of the large campaign against use of plastic bottles and plastic items, Mr. Sopte said.

प्रेस रीलीज

**जीटीडीसीतर्फे प्लॅस्टिकविरोधात युद्ध घोषित, प्लॅस्टिकच्या बाटल्या, कप आणि स्ट्रॉवर बंदी**

- गोवा पर्यटन विकास महामंडळाने (जीटीडीसी) आपल्या मुख्य कार्यालयापासून राज्यातल्या सर्व हॉटेल्समधील प्लॅस्टिकचे उच्चाटन करणार असल्याचे जाहीर केले आहे.
- सर्व रेसिडेन्सीज येत्या 3 महिन्यांत प्लॅस्टिकच्या बाटल्या/कप/स्ट्रॉ मुक्त होणार आहेत
- या अभियानात हॉटेल उद्योगालाही सहभागी करून घेतले जाणार आहे

पणजी, 20 जुलै - गोवा पर्यटन विकास महामंडळाने (जीटीडीसी) आपल्या मुख्य कार्यालयापासून राज्यातल्या सर्व हॉटेल्समधील (जीटीडीसी रेसिडेन्सी) महिन्यांत प्लॅस्टिकच्या बाटल्या/कप/स्ट्रॉचे उच्चाटन करणार असल्याचे आज जाहीर केले.

जीटीडीसीचे माननीय अध्यक्ष श्री. दयानंद सोपटे म्हणाले, 'हा निर्णय दीर्घकाळात पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी आणि राज्यात बिकट बनलेली प्लॅस्टिक कचऱ्याची समस्या कमी करण्यासाठी उपयुक्त ठरेल. प्लॅस्टिक कचऱ्याचे वाढते प्रमाण ही एक जटिल समस्या बनली असून आपण आपले पर्यावरण प्लॅस्टिकमुक्त ठेवणे आवश्यक आहे.'

हा निर्णय जीटीडीसीच्या नुकत्याच झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला असून त्यामुळे आता यापुढे चहा, क़फी इत्यादीही कागदाच्या कपमध्ये अथवा ग्लासमध्ये दिला जाणार आहे. पाण्याच्या टाक्या, पाण्याचे फिल्टरही पर्यटन मुख्यालय आणि सर्व रेसिडेन्सीमध्ये बसवले जाणार आहे. पाणीसुद्धा धातूच्या किंवा काचेच्या बाटल्यांमध्ये पुरवले जाणार असून या बाटल्या परत वापरण्याजोग्या असतील.

या उपक्रमाविषयी श्री. सोपटे पुढे म्हणाले, 'जीटीडीसीमध्ये आम्ही हा उपक्रम आधी मुख्यालय आणि आमच्या सर्व रेसिडेन्सीमध्ये राबवण्याचे ठरवले असून पुढील तीन महिन्यांत तो अमलात आणला जाणार आहे. यामुळे आम्हाला पर्यावरण जतनाच्या या उपक्रमात महत्त्वाची भूमिका निभावणे शक्य होईल. प्लॅस्टिकच्या वस्तूंवरील बंदीचा हा निर्णय पर्यावरणदृष्ट्या शाश्वत पर्यटन क्षेत्राच्या निर्मितीस मदत करेल.'

पर्यटन क्षेत्रात प्लॅस्टिकच्या बाटल्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो आणि त्यांचा समुद्रातील प्रदुषणात तब्बल 20 टक्के वाटा आहे. राज्यभरातील जीटीडीसीच्या सर्व रेसिडन्सीज येत्या तीन महिन्यांत हळूहळू प्लॅस्टिकच्या बाटल्या, प्लॅस्टिक कप्स आणि स्ट्रॉजचा वापर बंद करतील.

हे साध्य करण्यासाठी आम्ही पर्यन क्षेत्रातील भागधारक आणि हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील इतर भागिदारांना प्लॅस्टिकच्या बाटल्या व इतर वस्तूंविरोधातील या अभियानात सहभागी करून घेणार आहोत, असेही श्री. सोपटे म्हणाले.